Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव

**डॉ. सिंधू बाबाराव सोलापुरे**
मराठी विभाग,
श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय
देवगाव रं, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

जागतिकीकरण ही आजच्या काळातील सर्वात महत्वाची घटना आहे आर्थिक उदारीकरण, खाजगीकरण या गोष्टी या घटनेचे अविभाज्य घटक आहे. जागतिकीकरण ही संकल्पना तशी आपणास नवीन नाही फार प्राचीन काळापासून आम्ही वसुधैव कुटुंबकम्' हे विश्वची माझे घर' यासारखी स्वप्ने पाहत आलो आहोत राष्ट्राराष्ट्रातील आर्थिक संबंध पूर्वापार चालत आले असून व्यापाऱ्यांनी जगभर हिंदून आपल्या मालासाठी नव्या बाजारपेठा शोधणेही जगाला काही नवीन नाही मात्र नव्वदच्या दशकानंतर जागतिकीकरण या संकल्पनेच्या जुन्या संकल्पना नष्ट झाल्या व आधुनिक जागतिकीकरण बहुराष्ट्रीय कंपन्याच्या भोवती फिरू लागले. या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी संपूर्ण जगाला बाजारपेठ बनवले यामागे माहितीचा प्रस्फोट, दळणवळणक्रांती व तंत्रज्ञानामध्ये झालेला प्रचंड बदल हा घटक महत्वपूर्ण ठरला. यामागे आर्थिक हित व व्यापारी उदिष्टे असली तरी राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये यामुळे प्रचंड उलथापालथ झाली. जागतिकीकरणामुळे राष्ट्रांच्या सीमारेषांना आर्थिक व सांस्कृतिक पातळीवरच नव्हे, तर राजकीयपातळीवरही विशेष महत्व आज उरलेले नाही. या अवस्थेमध्ये बहुद्देशीय कंपन्या खऱ्या अर्थाने सत्ताधारी ठरल्या आहेत.

जागतिकीकरणामध्ये विशिष्ट भाषांचे अस्तित्व, सांस्कृतिक अस्मितांचे अस्तित्व राहील की नष्ट होईल ही भीती आज निर्माण झाली आहे. जागतिकीकरणाचा परिणाम केवळ नागरी भागापुरताच आज मर्यादित राहिलेला नसून एकूणच जीवनावर झालेला दिसून येतो. याचा परिणाम सर्वच देशामध्ये पसरलेला दहशतवाद असुरक्षितता, ताणतणाव पसरलेला आहे. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे पारंपरिक उदयोगधंदे बाजूला फेकले गेले, चंगळवाद वाढला आणि सर्वसामान्यांचे जगणे अधिकच खडतर झाले शेतक-यांच्या आत्महत्या हे याचे अपत्य आहे. नव्या आधुनिकीकरणामध्ये निर्माण झालेल्या मॉल्स संस्कृतीचे आक्रमण मानवी जीवनावर झालेले दिसून येत आहेत. तंत्रज्ञानाच्या अफाट वेगामुळे जीवनातील यांत्रिकता कितीतरी पटीने वाढली आहे. मात्र संवाद, आस्था, भावना गोवून एकाकीपणा, रितेपणा, नात्यातील फोलपणासमोर येत आहे.

संदेशवहन व दळणवळण यांचा वेग कल्पनातीत वाढला असला तरी माणसे जवळ न येता उलट अधिकाधिक दुरावत चालल्याची भावना वाढत आहे. जागतिकीकरणामध्ये अनेक बदल होत असतांना आपल्या व्यवस्थेतील पूर्वीपासून चालत आलेले धार्मिक, जातीय, लैगिंक प्रश्न नव्या व्यवस्थेतही तसेच आहेत. आजही दारिद्रच, विषमता, श्रद्धा, अंधश्रद्धा तशाच आहेत किंबहुना त्याअधिक उग्र होतांना दिसतात. या आणि अशा अनेकविध आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांनी, पेचांनी भरलेले भोवतालचे वास्तव मराठी साहित्यिकांसमोर आहे. अनेक कवी आणि लेखक या प्रश्नांना सामोरे जातांना, त्यासंबंधीच्या त्यांच्या प्रतिक्रियाचा, प्रतिसादाचा अविष्कार विविध साहित्य प्रकार य प्रवाहातून करताना दिसून येतात या जागतिकीकरणाचा प्रभाव मराठी साहित्याच्या कविता व कादंबरी या साहित्यप्रकारावर कसा पडला आहे. याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधांमध्ये घेतला आहे.

**जागतिकीकरणाचा मराठी कवितेवरील प्रभाव -**

जागतिकीकरणाच्या माध्यमाद्वारे निर्माण होणारी ग्लोबल भाषा व चिन्हाचा स्वीकार मराठी भाषा बोलणाऱ्यानी केला आहे. जागतिकीकरणानंतर अनेक नवनवीन शब्दाचा वापर मराठी भाषेमध्ये सहजपणे होताना दिसतो. काम्पुटर, सायबर विश्‍व, इंटरनेट, मोबाईल ईमेल, मेसेज, वेब, टिकी ब्रेकिंग न्यूज चैनल्स, पिझ्झा, बर्गर यासारखे शब्द सर्रासपणे मराठी भाषिक बोलताना दिसतात. जागतिकीकरणामुळे नवीन आलेल्या तंत्रज्ञानाचा व बाजारपेठीय वस्तुचा मोह मराठी माणसालाही होतो आहे. या सर्व प्रतिमा व प्रतिकांचा वापर किंवा आविष्कार साहित्यिकारही करत आहेत, त्यासोबतच जागतिकीकरणामुळे व्यक्तिगत व सामूहिक मानवी जगण्यावर मानवी संबंधावर कोणते परिणाम झाले आहेत यासंबंधीचे चित्रण मराठी कवींनी केलेले आहे. प्रफुल्ल शिलेदार यांनी आपल्या महापूर या कवितेमध्ये सर्वदूर पडणाऱ्या ग्लोबली वादळी पावसाने जगभरात कसा हाहाकार माजवला आहे याचे चित्र उभे करताना म्हणतात,

'या महापुरात घातलेय ट्रॉलर्स महाकोळयांनी,
त्यांच्या ऑप्टीकल महाजालात गावतायत त्यांना,
लहानमोठया संस्कृतीचे बवकळ मासे.
महाकोळी घेतायत मत्स्यशेतीत महापीक,
सातही समुद्रात सुरु झालेली साठमारी महाकोळयांची.'

जागतिकीकरण व बहुदेशीय कंपन्या व त्यांनी निर्माण केलेली बाजारपेठ इ. गोष्टी महापुराच्या रूपकाद्वारे मांडल्या आहेत तर जागतिकीकरणामुळे नोकरी व्यवसायातील आणि एकूणच जीवनातील भीती, असुरक्षितता अस्थिरता मोठ्या प्रमाणात वाढली आहे

याचे चित्रण अनेक कवींनी केलेले दिसून येते. 'तुम्ही असता एक अफवा या कवितेत कची वर्जेश सोलंकी म्हणतात,

तुम्हाला पछाडलेल असत भयान। वा तुम्ही पळत असता धोबीपछाड होऊन।
आपले हात उंचावून। चालवलेली असते आतल्याआत तुम्ही कफर्युची तयारी।
दुसरीकडे तुम्ही भर जमावात। शर्ट काढून होता ओणवे ।
पायाच्या थरथरीने मान्य केलेली असते शरणागती।

याच दहशतीचा अविष्कार, असुरक्षिततेविषयी प्रवीण बांदेकर 'खेळखंडोबा' या कवितेत म्हणतात,

'भेदरलेल्या माणसांना कळत नाहीये, आजच्यापुरत जगाव की आतापुरतंच
आपल्यापुरताच जगाव की स्वत पुरतंच,
किंवा जगण्यासाठीच असावं की आहोत म्हणून जगावं'.

जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे आपल्याला जगण्यासाठी काय हवं आहे. याचा विचार करणेही कठीण झाले आहे, जागतिकीकरणाला काही कवयित्रींनाही विरोध केला आहे. त्यांच्या कवितेतून माणसाच्या वस्तुकरणाची चिंता व्यक्त झाली आहे. कवयित्री नीरजा माणसाचे वस्तुकरण कसे होते आहे याविषयी म्हणतात,

'शॉपिंग मॉल्स वाहताहेत, ओसंडून।
माणस चकचकीत फरशी सारखी।
घरंगळताहेत स्वतःवरूनच।
डिस्काउंटची पाटी गळ्यात अडकवून|
हातोहात विकली जाताहेत माणस|

जागतिकीकरणामुळे निर्माण केलेल्या व्यवस्थेतील अमानुषता, तिच्यातील विसंगती विषयी श्रीधर तिळवे लिहितात,

तुमच्या हायटेक संस्कृतीत,
माझी लोटेक कविता,
तुम्ही करताय सर्वत्र स्लोपायझनिंग,
आणि मी कवितेच्या अमृतान्,
आयुष्य गोड करण्याचं स्वप्न पाहतोय
तुम्ही उदया हवाही विकायला काढाल,
पण कवितेची शपत घेऊन सांगतो,
मी मरण पत्करने,
पण माझे श्वास तुमच्याकडे जगण्याचे पेटन्ट मागणार नाहीत.

जागतिकीकरणाच्या काळात जग भलेही जवळ आले असेल पण माणसाचा माणसांशी संवाद राहीला नाही. ती एकमेकांपासून दूर जात आहेत. अगदी कुटुंबांतील संवादही नष्ट होत आहे. माणसे अधिक स्वकेंद्री एकटी होत आहेत. प्रवीण बांदेकराच्या खेळखंडोबाच्या नावान या कवितेतील कवी म्हणतो,

"कळू लागले तेव्हा कदाचित।
खाजगी संवादासाठीही आपल्यातल्या धुंडाळाव लागेल तुला मला।
एखाद इ-मेल, इंटरनेट, वेबसाईट, डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू।
पिता पुत्र संवाद डॉट कॉम।
किंवा तसलंच एखाद तंत्र।
ज्यात फत्त शब्दच असतील कोरडे।
कानात्राला हरवलेले।
नि थुंकल्या जातील भावना।
टेक्निकली आऊटडेटेड म्हणून."

तर याविषयी वीरधवल परब म्हणतात,

"आऊटडेटेड होत जाते आपल्या संवेदनशीलतेची चीप।
कम्पुटरायझेशनच्या रेट्यात?"

प्रज्ञा पवारही म्हणतात,

'ग्लोबल व्हिलेजात सापडेल आपल्याला।
आपली अस्सल कातही? वास्तूच्या आक्रमणाची,

वस्तुकरणाची ही भीती या संवेदनशील कवीना वाटते आहे.

प्रवीण बांदेकर सारख्या कवींनाही प्रश्न पडतात की,

"कळत नाहीये कुणालाच दिवस आहे की रात्र।
जागे आहोत की झोपेत आपण।
हे लिंग का फुरफुरतय पाण्यापाशी अडून।
आणि हे आपलेच अवयव की ब्रेन्डेड प्रॉडक्ट्स।
हरवलेयत ज्या स्पर्श, रंग, चवी आणि वास खेळखंडोबाच्या जत्रेत..."

कवी नितीन वाघ म्हणतात,

'समजत नाही साला माणूस ब्रॅण्डशिवाय,
आपआपल्या नावाचं होर्डींग का बनवून घेत नाही.

प्रत्येकजण. वस्तुकरणामध्येच अमानवीकरण, यांत्रिकीकरण झाल्याची खंत कवी व्यक्त करताना दिसतात. बाजारपेठेच्या आक्रमणामुळे एकूणच अआहेरे वर्गाचा चंगळवाद

कसा वाढला आहे, भोगवादीवृत्ती कशी चाढली आहे याचे चित्रण कवयित्री नीरजा पुढील शब्दात करते,

'माणसांना आजार झालाय ग्लोबलायझेशन नावाचा,
साथ पसरतेय वेगाने भोगू पाहतात वाट्याला आलेला प्रत्येक क्षण,
मल्टिप्लेक्स किंवा डिस्कोथेकच्या थांब्यावर, माणस स्वतःच झाली आहेत।
प्रचंड शॉपिंग मॉल चकचकीत.'

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा उपहास करणाऱ्या कवींमध्ये अरुण काळे यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांच्या अनेक कवितांच्या शीर्षकावरूनच हे लक्षात येते, उदा. प्रेमाचे होऊ द्या ना जागतिकीकरण, उधारीकरणाची सायबर खिंड, मल्टिलुटालुटीचा झिंग लपालपा, ग्लोबल खेढबाचे ग्लोबल येडे' इ. त्यांच्या कवितांमधून सर्वसामान्यांच्या शोषणाची, अन्याय, अत्याचाराची तीव्र जाणीव, व्यवस्थेतील विसंगती संयमी शब्दात व्यक्त झाली आहे. जागतिकीकरणाच्या प्रभावाविषयी, आक्रमणाविषयी मराठीतील अनेक कवींनी आपल्या कवितेतून चित्रण केलेले आहे, त्यात प्रामुख्याने प्रफुल्ल शिलेदार, श्रीधर तिळवे, मंगेश बाघ, अरुण काळे, प्रवीण बांदेकर, प्रज्ञा पवार, नीरजा, वीरधवल परब, नितीन वाघ, महेंद्र भवर यांचे नाव घ्यावे लागेल.

**जागतिकीकरणाचा मराठी कादंबरीवरील प्रभाव -**

जागतिकीकरणाचा परिणाम एकूणच सर्व मानवी जीवनावर जसा झाला त्याप्रमाणे सर्वच साहित्यप्रकार व प्रवाहावरही झालेला आहे. ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंब-यामधूनही जागतिकीकरणाचे पडसाद उमटले आहेत. विशेषतः इथला शेतकरी त्यांच्या शेतीमधून कसा उखडला गेला आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे त्याची सर्वबाजूने होणारी गुंतागुंत सदानंद देशमुख, अशोक कौतिक कोळी, कृष्णात खोत, गणेश आवटे यांच्या कादंब-यांमधून चित्रण आलेले आहे. नवी व्यापारी नीती कशी कार्यरत आहे व्यापारी, राज्यकर्ते जागतिकीकरणात सर्वच गोष्टीचे बाजारीकरण झाले. जीवनात पैसे केंद्रवती आला पर्यटन, माध्यम मनोरजन् संगणकक्रांती, स्मार्टफोन, सोशल मिडिया, जाहिराती, मॉडेलिग मार्केटिंग, आय पी एल क्रिकेट, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, बहुराष्ट्रीय कंपन्या, सेझ, तयार व घरपोच मिळणारे खाद्यपदार्थ शीतपेय बाटलीबंद पानी मॉलसस्कृती हे सर्व गेल्या दोन तीन दशकातील जागतिकीकरणामुळे झालेले बदल आहेत हे सर्व बदल वास्तवात मांडून जीवनवास्तवाचा वेध नवोत्तर गराठी साहित्यात आलेले दिसून येते. वरील सर्वच घटक विविध कादंबऱ्यांमधून ज्या समर्थपणे यायला हवे तितके येताना दिसत नसले तरी आशय, अभिव्यक्तीच्या माध्यमातून एक किंवा अनेक घटकांचे समिश्र आयोजन करून कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न झालेला आहे.

एकंदरीतच जागतिकीकरणाचा प्रभाव मराठी समाज, संस्कृती आणि साहित्य या सर्वावर झालेला दिसून येतो. यामुळे निर्माण झालेल्या बहुराष्ट्रीय कंपन्याचे जाळे, मॉल्स संस्कृतीमुळे माणसांचे मूल्य कमी झाले. नवभांडवलशाही उदयास आली आहे. पारंपरिक उदयोग व व्यवसाय व त्यावर आधारित श्रमसंस्कृती नष्ट होऊन सामाजिक दरी वाढत गेली. जीवनाच्या सर्वच क्षेत्रामध्ये पराकोटीचा संघर्ष निर्माण झाला आहे. नवनवीन शोधामुळे जग जवळ आले पण माणसे माणसापासून दूर जात आहे. या सर्वांचा प्रभाव कविता व कादंबरी या साहित्यप्रकारावर जास्त प्रमाणात झालेला दिसून येतो. समताधिष्ठीत व न्यायपूर्ण समाजव्यवस्थेकडे कशी वाटचाल करता येईल यासाठी साहित्यिक मार्गही सांगतात, जागतिकीकरणामध्ये वस्तूसारखे माणसांचेही वापरा आणि फेका' हे तत्व निर्माण झाल्याचे जाणवते. जागतिकीकरण आपत्ती किंवा संकट न मानता त्याचा योग्य प्रकारे स्वीकार केला तर संपूर्ण मानव जातीचे कल्याण होईल हा आशावादही मराठी साहित्य निर्माण करत आहे.

**संदर्भ-**

१) जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य, (संपा.) नागनाथ कोत्तापल्ले, दत्ता भगत, सायन पब्लिकेशन, प्रा. लि. पुणे. प्रथमावृत्ती, 2017

२) साहित्य बदलते परिप्रेक्ष्य, रा.ग. जाधव, पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती, 2011

2) साहित्याचा अन्वयार्थ, नागनाथ कोत्तापल्ले, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती, 2008

3) मराठीतील राजकीय कादंबरी, संपा, श्रीकांत तिडके, शिवाजी नागरे, प्रतिभा प्रकाशन, पुणे. प्र. आ. 2009

४) मराठी कादंबरीचा इतिहास, बंदीवडेकर चंद्रकांत, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्र.आ. 1989

५) महाराष्ट्रातील राजकारणाचे साहित्यातील प्रतिबिंब, संपा. विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्र.आ.1998